**HAFFKINE BIO-PHARMACEUTICAL CORPORATION LTD.**
*(Govt. of Maharashtra Undertaking)*
Acharya Donde Marg, Parel, Mumbai – 400 012, Maharashtra. India.
Telefax :- 022-2414 7564, Board:- 022-24129320 / 21 *Email:-* mm@vaccinehaffkine.com

**Date:- 08.04.2026**

## शुध्दीपत्र १ (Corrigendum 1)

**Tender Ref. No.:- HBPCL/M-02/Canteen-Mumbai/26-27 Dt.03.04.2026**

**Tender ID No. :- 2026_HBPCL_1292493_1 Dt.03.04.2026**

हाफकिन जीव–औषध निर्माण महामंडळ, आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई – ४०००१२ येथील कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांच्यासाठी उपहारगृह सेवा (वर्ष २०२६–२७) या १ वर्ष कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने चालविण्यासाठी अनुभवी आहार व्यवस्था करणाऱ्या खाजगी ठेकेदाराकडून/भागीदारामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यवसायधारकांकडून/खाजगी व्यवसायधारक कंपनीकडून/ उपहारगृह चालकांकडून खाद्य व पेय पदार्थ पुरविण्यासाठी इ–निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०३.०४.२०२६ दुपारी ०३.४५ वाजल्यापासुन ते दिनांक १४.०४.२०२६ पर्यंत रोजी दुपारी ०३.३० वाजेपर्यंत ऑनलाईन उपलब्ध आहेत.

सदर इ–निविदा भरण्यास इच्छुक असणा–या ठेकेदारांसाठी इ–निविदेबाबत माहिती देण्यासाठी व त्यांच्या काही शंका असल्यास त्याच्या निरसनासाठी बुधवार दि.०८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता निविदा पुर्व सभा (Pre-Bid Meeting) हाफकिन जीव–औषध निर्माण महामंडळ, कॉन्फरन्स रूम, आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई –४०००१२ येथे संपन्न झाली. सदर सभेस हाफकिन महामंडळातील अधिकारी, उपहारगृह समितीचे सदस्य व इच्छुक ठेकेदार उपस्थित होते व या सभेत पुढील मुददयावर चर्चा झाली.

१. इ–निविदेतील पृष्ठ क्रमांक ७ वरील अनु.क्र.२७ नुसार ठेकेदारास उपहारगृह चालविण्याचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे असे नमुद केले आहे. **सदरमध्ये अनुभवाची अट ५ वर्षाऐवजी ३ वर्ष करण्यात येत आहे.**

२. ठेकेदाराच्या कंपनीची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (Annual Turnover) कमीतकमी रू.५०/– लाख असणे आवश्यक आहे व त्याबाबतचे प्रमाणित कागदपत्र तांत्रिक निविदेत जोडणे आवश्यक आहे.



MANAGING DIRECTOR'S OFFICE
HAFFKINE BIO PHARMA CORPN. LTD.
Inward No. 898 Date 09/04/2026

Scanned with OKEN Scanner

३. ठेकेदारांकडुन इतर आस्थापनांच्या उपहारगृहांना करत असलेल्या सेवा पुरवठांचे कागदपत्रे तांत्रिक निविदेत सादर करणे आवश्यक आहे तसेच हाफकिन महामंडळाच्या उपहारगृह समितीचे सदस्य आवश्यक वाटल्यास ठेकेदार सेवा देत असलेल्या इतर आस्थापनांच्या उपहारगृहांना भेट देतील.

४. चहा, नाश्ता व जेवणाचे दर हे इ—निविदेत असलेल्या BOQ मध्येच ऑनलाईन भरावे. **तांत्रिक निविदेत नमुद करू नयेत.**

५. प्रथम कराराची मुदत एका वर्षाची असेल. या करार कालावधीत ठेकेदाराची सेवा समाधानकारक असल्यास व मा. व्यवस्थापकीय संचालकांना योग्य वाटल्यास त्याच अटी व शर्तीसह उभयपक्षी मान्य असल्यास कराराची मुदत व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने पुढील एक वर्ष (एकूण दोन) वर्षापर्यंत वाढविता येईल. सदर दुस—या वर्षासाठी मुळ दरामध्ये आपणास किती टक्के दरवाढ आवश्यक आहे याबाबत इ—निविदेतील पृष्ठ क्रमांक १६ वर टक्केवारी नमुद करण्यात यावी व सदर पृष्ठ क्रमांक १६ सही व शिक्यासहीत तांत्रिक निविदेत सादर करावा.

६. वरील सर्व विषयांवर हाफकिन महामंडळाचे अधिकारी व उपहारगृह समिती सदस्य यांच्या उपस्थितीत चर्चा करण्यात आली व उपस्थित ठेकेदारांची विंनती मान्य करून त्याप्रमाणे शुध्दीपत्र (Corrigendum) देण्याचे या सभेत मान्य करण्यात आले त्यानुसार सदर शुध्दीपत्र प्रसिध्द करण्यात येत आहे.

09/4/2026
श्री. प्रशांत द. तांबे
कक्ष अधिकारी, सामुग्री विभाग

09/04/26.
श्रीमती अवंतिका पवार
उपहारगृह समिती सदस्य

09/04/2026
श्री. विकास धाइंजे
उपहारगृह समिती सदस्य

09/04/2026
श्री. प्रणय पार्लेवार
कनिष्ठ अभियंता स्थापत्य

09/4/2026
श्री. उमेश पवार,
सामुग्री व्यवस्थापक

०९/४/२०२६
श्री. अमित डोंगरे,
कामगार कल्याण अधिकारी

09.04.26
श्री. मिलिंद कालोलीकर
मा. महाव्यवस्थापक (उत्पादन)

9.4.2026
श्री. सुनिल महिंद्रकर, (भा.प्र.से.)
मा. व्यवस्थापकीय संचालक

जावक क्र. 807 दि. 09/04/2026
महाव्यवस्थापकांचे कार्यालय (उत्पा.)
हा. जी. औ. नि. म. म.,
परळ, मुंबई - ४०० ०१२.



Scanned with OKEN Scanner